पुणे TODAY सकाळ
बुधवार
२६ जुलै २०१७
पाऊस C
कमाल किमान
28.2°/21.5°

सकाळ ज्युनियर लीडर



औंध : सिटी इंटरनॅशनल इंग्रजी शाळेत ज्युनियर लीडर कार्यक्रमात विद्यार्थ्यांसह सेल्फी काढून धम्माल करताना अभिनेते पुष्कर श्रोत्री शेजारी मुख्याध्यापिका शिल्प गुजरे.

# औंधमध्ये पुष्कर श्रोत्रींसह विद्यार्थ्यांनी केली धम्माल

**औंध, ता. २५ :** चित्रपट व दूरचित्रवाहिनीवरील मालिकांध्ये रोज पाहत असलेले कलाकार थेट समोरासमोर पाहिले तर किती धम्माल करता येते, याचा अनुभव आज औंध येथील सीटी इंटरनॅशनल शाळेतील विद्यार्थ्यांनी घेतला. मराठी व हिंदी चित्रपटांत अनेक नावीन्यपूर्ण व वैविध्यपूर्ण भूमिका करणारे अभिनेते पुष्कर श्रोत्री यांच्याशी थेट विद्यार्थ्यांना संवाद साधता आला. तसेच चित्रपटसृष्टीतील अनुभवसुद्धा ऐकायला मिळाले. निमित्त होते 'सकाळ'च्या वतीने घेण्यात येत असलेली 'ज्युनियर लीडर'

ही शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आलेली स्पर्धा. त्याची माहिती शाळेतील विद्यार्थ्यांपर्यंत पोचविण्यासाठी आयोजित कार्यक्रमाचे. या वेळी विविध विषयांवर श्रोत्री यांनी मार्गदर्शन केले तसेच शैक्षणिक प्रगतीसाठी 'सकाळ'चा असलेला सहभाग, याविषयीही विद्यार्थ्यांना माहिती दिली. ज्ञान मिळविण्यासाठी वाचन करण्याचा सल्लाही दिला. मुख्याध्यापिका शिल्पा गुजरे, निरीक्षक अपर्णा कुलकर्णी, राजेंद्र साबळे आणि इतर शिक्षक उपस्थित होते. या वेळी पुष्कर श्रोत्री यांनीही विद्यार्थ्यांमध्ये मिसळून सेल्फी काढून धम्माल केली.